**अतिकालिक भत्ता**
बृहन्मुंबई, जिल्हा व तहसील येथील
कार्यालयातील गट 'ड' कर्मचाऱ्यांना
देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक-अकाभ-१४११/प्र.क्र.१०/ सेवा-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०००३२. दिनांक ४ नोव्हेंबर, २०११.

पहा : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-जीसीएस-१३८२/सीआर-३२४/एसईआर-९, दिनांक २० जुलै, १९८२
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-अकाभ-१३८८/सीआर-७०९/एसईआर-९, दिनांक १८एप्रिल, १९९०.
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-अकाभ-१३९४/प्र.क.३२/एसईआर-९, दिनांक-२९ मार्च, १९९५.
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-अकाभ-१३०४/प्र.क्र.४०/ सेवा-८, दिनांक १६ ऑगस्ट, २००४.

## शासन निर्णय

बृहन्मुंबई , जिल्हे व तहसील येथील कार्यालयातील गट'ड'कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयीन कामासाठी थांबावे लागल्यास, मिळणाऱ्या अतिकालिक भत्त्याचे दर वर दर्शविलेल्या शासन निर्णयान्वये ठरविण्यात आले होते. उक्त अतिकालिक भत्त्याचे दर सुधारण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधिन होता. शासनाने असे ठरविले आहे की, शासकीय कार्यालयातील गट'ड'कर्मचाऱ्यांना कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयीन कामासाठी थांबावे लागल्यास त्यांना खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारित दराने अतिकालिक भत्ता देण्यात यावा.

| १ | बृहन्मुंबईतील कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचारी | |
|---|---|---|
| | वेळ | सुधारित दर |
| संध्याकाळी | ७-०० ते ८-०० पर्यंत | रु. २४/- |
| | ८-०० ते ९-०० पर्यंत | रु. ३०/- |
| | ९-०० नंतर | रु. ४०/- |
| २ | जिल्हे व तहसील या ठिकाणी असलेल्या कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचारी | |
| संध्याकाळी | ७-३० ते ९-३० पर्यंत | रु. ३०/- |
| | ९-३० नंतर | रु. ४०/- |

ज्या गट'ड'कर्मचाऱ्यांना अन्य कोणत्याही आदेशानुसार अतिकालिक भत्ता मिळत असेल त्यांना या आदेशानुसार अतिकालिक भत्ता मिळणार नाही.

२. हे सुधारित दर या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन

कृ.मा.प....

देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१११११०८१११२२०००००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( स.अ.मु. नकवी )
शासनाचे उपसचिव

प्रति.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) -१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) -२,महाराष्ट्र, नागपूर (६०प्रती)
महालेखापाल (लेखापरीक्षा ) -१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा ) -२, महाराष्ट्र, नागपूर (६० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई ( ५ प्रती )
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ( ४० प्रती )
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन,वाशी,नवी मुंबई ( १० प्रती )
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई ( १० प्रती )
विधानमंडळाचे सर्व सदस्य
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे सचिव
उपमुख्यमंत्र्याचे सचिव
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
* प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा), मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपिल शाखा), मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
* मुख्य माहिती आयुक्त, मुंबई
* आयुक्त राज्य माहिती आयोग ( सर्व)
* सचिव, राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
ग्रंथपाल,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन मुंबई (२५ प्रती )
मंत्रालयातील सर्व विभाग.
मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील विभागांच्या अधीनस्त सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर ( १० प्रती ),
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती )
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला, (१० प्रती )
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा-रत्नागिरी (१० प्रती )
कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
कुलसचिव डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे जिल्हा - रायगड.
बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१ ( ५ प्रती )
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश , सी. डी. ओ. बॅरॅक -१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट,मुंबई-२० (५ प्रती )
भारतीय कम्युनिष्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई-४ (५ प्रती )
भारतीय कम्युनिष्ट पार्टी, ( मार्क्सवादी ) महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोबल मिल पॅलेस, वरळी,मुंबई-१३ (५ प्रती )
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय ) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई -२५ ( ५ प्रती )
नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - २१ (५ प्रती )
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर , मुंबई -२८ (५ प्रती )
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती - सेवा-६

*पत्राव्दारे

----------